कुणी गोविंद घ्या...?

गुण्या गोविंदाने नांदण्याची परिभाषा सांगणारा

१७ मार्चला मराठी रंगभूमीवर 'कुणी गोविंद घ्या...?' हे नाटक प्रेक्षकांच्या भेटीला आले. गडकरी रंगायतन येथे या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग पार पडला. अनेक प्रेक्षकांनी या नाटकाला पसंती दर्शवली. या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन दीपेश सावंत यांनी केले आहे. प्रसाद रावराणे, सिद्धेश नलावडे आणि विभूती सावंत अशी तरुण कलाकारांची फळी या नाटकात दिसणार आहे. यशवंत क्रिएशन आणि अर्चना थिएटर्स यांनी या नाटकाची निर्मिती केली आहे. रॉबिन लोपेज व राम सगरे यांचे नेपथ्य, संकेत शेटगे यांचे संगीत व शिवाजी शिंदे यांची प्रकाशयोजना या नाटकाला लाभली आहे. उदयराज तांगडी हे निर्मिती प्रमुख असून नाटकाचे निर्माते म्हणून मोनाली तांगडी, शेखर दाते व दुर्वा सावंत हे जबाबदारी सांभाळत आहेत.

आजकाल आपल्या प्रत्येक नात्यामध्ये संवादाचा अभाव पाहायला मिळतो. अनेकदा आपण नात्यांमध्ये एकमेकांना गृहीत धरतो. स्वतःच वेगवेगळ्या कल्पना करून घेतो. पण एकमेकांशी बोलण्याने, तसेच आपण आपले मत शांतपणे मांडले तर समस्या नक्कीच सुटतात, असा विचार या नाटकामध्ये मांडण्यात आला आहे.

या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन दीपेश सावंत यांनी केले आहे. ते या नाटकाबद्दल म्हणाले की, "बऱ्याचदा आपण पाहतो की आजकाल प्रत्येक नात्यांमध्ये संवाद हा खूप कमी झाला आहे. एकमेकांशी बोलणं कमी होत, आणि यामुळे आपण एकमेकांना गृहीत धरून बसतो आणि गैरसमज निर्माण करून घेतो. मी हे नाटक यासाठी लिहिले कारण, जर तो मुद्दा वेळच्यावेळी आपण संधीत व्यक्तीशी बोललो असतो तर पुढे काही प्रॉब्लेमच येणार नाहीत.

सध्याच्या घडीला हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. म्हणून मला हे लिहावंसं आणि याचा नाटक करावंस वाटलं. हे नाटक विनोदी तर आहेच, पण नकळतपणे या नाटकातून एक महत्त्वाचा संदेश देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. राहिला प्रश्न लेखक आणि दिग्दर्शक या दोन्ही भूमिका एकत्र सांभाळण्याचा तर एक लेखक म्हणून मला खूप जास्त हात आखडता घ्यावा लागला. कारण हे नाटक खूप मोठे होते, पण एका आतल्या दिग्दर्शकामुळे माझे अनेक मोह मी टाळले आहे. पण प्रेक्षक म्हणून हे नाटक तुम्ही एन्जॉय कराल हे नक्की."

या नाटकाचे निर्मिती प्रमुख उदयराज तांगडी म्हणाले की, "गेली १०-१२ वर्षे झाले, आम्ही हे नाटक करायचे असे आमचे विचार होते. पण काही अडचणींमुळे हे नाटक थोडं उशिरा रंगभूमीवर आलं.

पण या नाटकाचा विषय थोडा वेगळा आहे. कारण, हे नाटक म्हणजे नवरा बायकोच्या नात्यांमधील काही अडचणी वेगळ्या पद्धतीने समोर मांडणारे आहे. त्यामुळे हे वेगळ्या धाटणीचे नाटक आहे आणि हे प्रेक्षकांनाही बघायला नक्की आवडेल." तसेच, अभिनेते प्रसाद रावराणे म्हणाले की, "हे नाटक तीन पात्रांचे आहे, आणि माझी भूमिका ही सरळसाधी आहे. कुठेही तत्वज्ञान न झाडता मिश्कीलपणे मेसेज देऊन जाणारा आहे.

आज प्रत्येक नात्यामध्ये एक गोष्ट मिसिंग आहे ती म्हणजे संवाद. हे असं का आहे? हे उत्तर मिळवण्यासाठी हे नाटक नक्की पाहायला या." यामध्ये भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री विभूती सावंत म्हणाल्या की, "या नाटकांमध्ये जी माझी भूमिका आहे, ती खूप टिपिकल असली तरी तिच्या वेगवेगळ्या शेड्स आहेत. त्यामुळे मला ही भूमिका करायला आवडते." तसेच, अभिनेते सिद्धेश नलावडे म्हणाले की, "मी याआधी खूप नाटक आणि एकांकिकांमध्ये गावरान भूमिका केल्या आहेत.

पण या नाटकामधली माझी भूमिका माझ्यासाठी थोडी वेगळी आहे. आणि ही भूमिका माझ्यासाठी अनेकदृष्ट्या आव्हानात्मक आहे. पण आम्हीही एक कलाकार म्हणून जेवढं हे नाटक करताना मजा केली आहे, तेवढी मजा प्रेक्षकही करतील हे नक्की सांगेन."

'घर बंदूक बिरयानी'तील मोस्ट वॉन्टेड गुंड गँग

झी स्टुडिओज आणि नागराज पोपटराव मंजुळे प्रस्तुत, हेमंत जंगल अवताडे दिग्दर्शित 'घर बंदूक बिरयानी' चित्रपटातील सयाजी शिंदे, नागराज मंजुळे, आकाश ठोसर आणि सायली पाटील हे प्रमुख कलाकार सर्वांसमोर आल्यानंतर आता चित्रपटातील मोस्ट वॉन्टेड 'डाकू गँग' समोर आली आहे. सोशल मीडियावर या 'डाकू गँग'चे पोस्टर्स प्रदर्शित झाले आहेत. या गँगमध्ये श्वेतांबरी घुडे, विठ्ठल काळे, नीरज जमगाडे- मायकल, सोमनाथ अवघडे, संतोष व्हडगीर (नाईक), ललित मटाले, प्रवीण डाळिंबकर, किरण ठोके, सुरज पवार, किशोर निलेवाडी, प्रियांशू छेत्री- बाबू , सुभाष कांबळे, गिरीश कोरवी, चरण जाधव, अशोक कानगुडे, आशिष खाचणे यांचा समावेश आहे. या डाकू गँगची सुनावणी येत्या ७ एप्रिलला जवळच्या चित्रपटगृहात होणार आहे. या 'डाकू गँग'च्या झळकलेल्या पोस्टरवर त्यांनी ॲक्टिंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता सुनावणीदरम्यान काय निकाल लागणार, याकडे आता प्रेक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे.

या कलाकारांबद्दल नागराज मंजुळे म्हणतात, '' या सगळ्या कलाकारांचे काम मी पाहिले आहे. काहींसोबत काम केले आहे. हे सगळेच कलाकार खूप मेहनती आहेत. सर्वांनीच खूप चांगले काम केले आहे. महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातील हे कलाकार असल्याने प्रत्येकाची एक वेगळी शैली आहे. त्यामुळे त्यांचा अभिनय हा अधिक नैसर्गिक वाटतो.''

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस कळविण्यात येत आहे की माझे अशील श्री सरोज कुमार जेना, फ्लॅट क्र. १/ए, वैकुंठ पार्क को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., ओम नगर, अंबाडी रोड, वसई (प), जिला : पालघर, पिन ४०१ २०२ चे रहिवाशी हे, सोसायटीचे मालक आणि सदस्य आहेत आणि त्यांचे नावातील शेअर प्रमाणपत्र विशिष्ट क्र. ३६ ते ४० चे धारक आहेत जे माझ्याकडून प्रवासा दरम्यान गहाळ झाले आहे किंवा हरविले आहे आणि माझ्या अशीलांनी यासंदर्भात दि. २३.०१.२०२३ रोजी क्र. २६५२, वर्ष २०२३ अंतर्गत एक पोलिस तक्रार आधीच दाखल केलेली आहे. त्यामुळे जर कोणासही सदर प्रमाणपत्र मिळाले तर अशा परिस्थितीत त्यांनी कृपया सदरहू सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखे पासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर कळवावे किंवा दस्तावेजी पुराव्यांसह लेखी स्वरूपात याची माहिती द्यावी. असे न केल्यास माझे अशील सोसायटी कडून वरील नमूद फ्लॅट क्र. १/ए साठी डुप्लीकेट शेअर प्रमाणपत्राचा दावा करण्यासाठी पात्र असतील. असे ही लक्षात घ्या की माझे अशीलांनी यापूर्वी दि. २८.०१.२०२३ रोजी मराठी दैनिक वर्तमानपत्र वसई समता मध्ये आणि दि. २४.०२.२०२३ रोजी इंग्रजी दैनिक वर्तमानपत्र द सिटी मध्ये सदर सूचना प्रकाशित केली आहे. परंतु त्यांना आतापर्यंत कोणताही दावा किंवा आक्षेप मिळालेला नाही. तरीही माझे अशील याद्वारे सदर मालमत्ते संदर्भात कोणत्याही व्यक्तीचा यापुढे कोणताही दावा, जर असेल, असल्यास त्यासंदर्भात सदर सूचना जारी करीत आहेत.

स्वाक्षरी/-
परेश बी. ठाकर
ॲडव्होकेट

सार्वजनिक सूचना

याद्वारे सर्वसामान्यांना सूचना देण्यात येत आहे की माझे अशील श्री. विनोद उर्फ विनोद राय जग जीवन दास शाह हे ३२३ चौ. फूट. (कार्पेट), ''द पंत नगर गणेश दर्शन सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड'' या नावाने ओळखल्या जाणार्या इमारतीमधील सहाव्या मजल्यावर, इमारत क्र. १४०, टी पी एस ३ येथे असलेल्या, अंतिम भूखंड क्र. ३५२, पंत नगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०००७५, नोंदणी जिल्हा आणि मुंबईच्या उपजिल्ह्यातील सी टी एस क्र. ५७४० गाव घाटकोपर - किरोळ, तालुका- कुडा, प्रत्येकी पाच शेअर्ससह रु. ५०/- एकूण रु. २५०/- शेअर प्रमाणपत्र क्र. ३९ अंतर्गत, दिनांक १०.०४.२००६ च्या नोंदणीकृत संमती करारांतर्गत, उक्त सदनिका क्रमांक ६०२ (जुना फ्लॅट क्र. ३८०८) संबंधित सोसायटीचे शेअर्स क्र. १०६ ते ११० (दोन्ही समावेशी) नोंदणी अंतर्गत अंतर्गत कुर्ला- १ येथील सब रजिस्ट्रार ऑफ ॲश्युरन्सच्या कार्यालयात रीतसर नोंदणी केली आहे.नोंदणी क्रमांक बी डी आर-३/०२८६७/२००६ दिनांक १०.०४.२००६.

माझ्या अशिलाने दिनांक १०.०४.२००६ च्या उक्त संमती कराराचा मूळ गमावला आहे आणि त्या फ्लॅटच्या संदर्भात शेअर सर्टिफिकेट दिले आहे. त्यानुसार, माझ्या अशिलाने उपरोक्त मूळ हरवल्याबद्दल पंत नगर पोलीस स्टेशन, घाटकोपर, मुंबई येथे पोलीस तक्रार दाखल केली आहे. माझा अशील (१) श्रीमतती मयुरी नवीन देधिया आणि (२) सौ. जिनल कमलेश देधियाच्या नावे उक्त फ्लॅटची विक्री करण्याचा मानस आहे.

दिनांक १०.०४.२००६ च्या मूळ संमती कराराच्या आधारे आणि शेअर सर्टिफिकेट किंवा अन्यथा कोणत्याही स्वरूपाच्या फ्लॅट आणि कथित शेअर्सच्या संदर्भात कोणताही दावा, हक्क, शीर्षक आणि स्वारस्य असलेल्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती केली जाते की त्यांनी ते लेखी कळवावे. सदनिका क्र. ६, कैलास भुवन क्र. १ सहकारी गृहनिर्माण संस्था लिमिटेड, एम.पी. वैद्य मार्ग, टिळक रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई-४०००७७ येथे कार्यालय असलेले खाली स्वाक्षरीनेदारांना, या सूचना प्रकाशनच्या तारखेपासून ७ दिवसांच्या आत, माहितीपटासह लेखी पुरावा कळवावा, ज्यामध्ये अयशस्वी झाल्यास अशा व्यक्तीचा दावा माफ केला गेला आणि/किंवा सोडला गेला किंवा सोडून दिला गेला असे मानले जाईल आणि त्यानंतर त्याची दखल घेतली जाणार नाही.

मुंबई, दिनांक १८ मार्च, २०२३.

(प्रयाग जोशी)
अधिवक्ता

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की श्री समीर फकीरचंद शहा आणि श्रीमती मीना समीर शाह (''मालक/पट्टेदार'') हे पहिल्या तपशिलामध्ये वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात भाडेपट्टीवर हक्क असल्याचा दावा करत आहेत संक्षिप्ततेसाठी) आणि नूतन लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.ने जारी केलेले शेअर्स दुसऱ्या तपशिलामध्ये वर्णन केले आहेत.

येथे लिहिले आहे (संक्षिप्ततेसाठी सांगितलेले शेअर्स). आमचे अशील उपरोक्त मालमत्तेतील विकासाचे अधिकार प्राप्त करण्यासाठी उपरोक्त मालकाशी वाटाघाटी करत आहेत आणि त्या मालमत्तेतील मालकाचे हक्क, शीर्षक आणि हितसंबंध आणि त्या शेअर्सची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती या मालमत्तेवर कोणताही दावा करत असल्यास किंवा त्यावर कोणतेही स्वारस्य असल्यास आणि विक्री, गहाण, शुल्क, देवाणघेवाण, भेटवस्तू, भाडेपट्टी, उप-लीज या द्वारे लिहिलेल्या पहिल्या आणि दुसर्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या शेअर्सवर , धारणाधिकार, भाडेकरू, परवाना, विकास हक्कांचे अनुदान किंवा वारस किंवा वारसा किंवा अन्यथा जे काही असेल, ते आम्हाला सहाय्यक कागदपत्रांसह लेखी कळवावे, जर असेल तर, आमच्या कार्यालयात पहिला मजला, १६ , राजाबहादूर हवेली, (पूर्वी बन्सीलाल मॅन्शन म्हणून ओळखले जाणारे), ११ , होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४००००१, येथे ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत कळवणे आवश्यक आहे , त्यामध्ये अयशस्वी झाल्यास शीर्षक आणि संबंधित व्यवहाराची चौकशी पूर्ण केली जाईल. अशा दाव्याचा कोणताही संदर्भ असल्यास, जर असेल तर तो माफ केला जाईल.

प्रथम अनुसूची
वर संदर्भित:

सीटीएस असलेल्या जुहू विलेपार्ले डेव्हलपमेंट स्कीममधील प्लॉट नं.९ /१ चा भाग असल्याने त्या जमिनीच्या सर्व तुकड्यातील किंवा जमिनीवर असणारा भूखंड नं.४१ मधील भाडेपट्टा हक्क. क्र ६४८ (मूळतः सर्व्हे क्र. ७० (भाग) असलेले), भाडेपट्टीनुसार ७९५ चौरस यार्डचे मोजमाप आणि पी.आर. कार्डनुसार ६६६.१ चौरस मीटरचे मोजमाप केलेले इमारत आणि त्यावर उभ्या असलेल्या इमारती आणि संरचना ज्यामध्ये ग्राउंड प्लस १ यांचा समावेश आहे. (एक) वरचा मजला, महसूल गाव जुहू येथे स्थित आहे, तालुका विलेपार्ले आणि जिल्हा मुंबई उपनगर आणि महानगरपालिका प्रभाग के (पश्चिम) नूतन लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.चा भाग आहे आणि उत्तर दक्षिण रोड क्रमांक ९ , जे व्ही पी डी योजना, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०४९ नोंदणी जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील उप-जिल्ह्यांमध्ये आणि खालीलप्रमाणे सीमा आहे:

उत्तरेकडे किंवा दिशेला : प्लॉट क्रमांक ४२ द्वारे
दक्षिणेकडे किंवा दक्षिणेकडे: प्लॉट क्रमांक ४० द्वारे
पूर्वेकडे किंवा रस्त्याने
पश्चिमेकडे किंवा दिशेने : भूखंड क्र. ३५

दुसरी अनुसूची
वर संदर्भित:

नूतन लक्ष्मी कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड द्वारा जारी ५ एप्रिल १९९८ रोजी शेअर प्रमाणपत्र क्रमांक २० अंतर्गत ५ (पाच) पूर्ण पेड अप शेअर्स प्रत्येकी ५०/- (रुपये पन्नास) विशिष्ट क्रमांक ३८१ ते ३८५ (दोन्ही समावेशी) असलेले.

दिनांक १८ मार्च २०२३

मे. शिराळकर आणि कं.
(वकील आणि कायदेशीर सल्लगार)

प्रशांत दामले यांचे नियम व अटी लागू

माणूस हा असा प्राणी आहे की, सामान्यपणे तो कोणत्याही मानवी नियमांत बसत नाही. कालचा माणूस आज वेगळा भासतो. कोणत्या प्रसंगी आपण कसे वागू हे निश्चितपणे सांगता येत नाही. त्यामुळे सांगणे आणि स्वतः वागणे यात फरक पडतो. थोडक्यात काय तर नियम व अटींच्या बाबतीत विचाराच्या, वागण्याच्या बाबतीत ठामच असावे, असा हट्ट अनेकदा चुकीचा ठरतो. सोयीनुसार नियमातून पळवाट काढताना अटींचा भंग होऊ शकतो. हे माहीत असूनही नियम व अटी लागू केल्या जातात. त्यात जर या नियम व अटी नवरा व बायकोच्या नात्याला लागू करायच्या असतील तर काय?

नियम अटींची ही कसरत पार पाडताना एका जोडप्याची होणारी तारांबळ पाहायची असेल तर निर्माते प्रशांत दामले यांनी भन्नाट नियम व मजेशीर अटींसह रंगभूमीवर आणलेलं 'नियम व अटी लागू' हे आजच्या पिढीचं खुसखुशीत नाटक चुकवू नका. गौरी थिएटर निर्मित व प्रशांत दामले फॅन फाऊंडेशन प्रकाशित 'नियम व अटी लागू' या नव्या नाटकाचा शुभारंभ शनिवार १८ मार्च सावित्रीबाई फुले नाट्यगृह डोंबिवली रात्रौ ८.३० वा. होणार आहे.

नेहा पेंडसे आहे सहा मुलांची आई!

मराठी, हिंदी, तमिळ, तेलुगू, आणि मल्याळम चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या मोजक्या अभिनेत्रींमध्ये नेहा पेंडसे या गुणी अभिनेत्रीचा समावेश होतो. अनेक चित्रपट आणि मालिकांमधून नेहा पेंडसे घराघरात पोहोचली. नेहा नेहमीच सोशल मीडियाच्या माध्यमांमधून आपल्या चाहत्यांच्या संपर्कात असते. परंतु नेहाची अशी एक गोष्ट आहे, जी तिच्या चाहत्यांना अजूनही माहित नाही आणि ती गोष्ट म्हणजे नेहा सहा गोंडस मुलांची आई आहे. 'पटलं तर घ्या विथ जयंती' या टॉकशोमध्ये नेहाने ही गोष्ट कबूलही केली आहे.

आता नेहाची ही क्युट मुलं कोण आहेत आणि हे नेमकं काय प्रकरण आहे, याचे उत्तर तुम्हाला येत्या शुक्रवारी म्हणजेच १७ मार्च रोजी प्लॅनेट मराठी ओटीटीवर मिळणार आहे. नेहाने शार्दूलसोबत नरिमन पॉईंट ते नायगाव चक्क हेलिकॉप्टरने प्रवास केला होता. आता अशा प्रवासाचे नेमके कारण काय, याचेही उत्तर तिने या टॉकशो मध्ये दिले आहे. या टॉकशोमध्ये तिच्यासोबत सिद्धार्थ मेननही हजेरी लावली आहे. यावेळी त्यानेही त्याच्या आयुष्यातील एक गुपित उघड केले. 'गल्ली बॉय' चित्रपटातील सिद्धांत चतुर्वेदीने साकारलेल्या एमसी शेर या भूमिकेसाठी सिद्धार्थला विचारणा करण्यात आली होती. आता ती भूमिका त्याच्या हातून का सटकली, यांचा खुलासा सिद्धार्थने केला आहे. असे त्याच्या सोबत अनेकदा घडल्याचेही त्याने सांगितले. मुळात नेहा पेंडसे आणि सिद्धार्थ मेनन यांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री जितकी सुंदर तितकीच त्यांची ऑफस्क्रीन केमिस्ट्रीही भन्नाट आहे. 'पटलं तर घ्या विथ जयंती' या टॉकशोमध्ये याचा अनुभव प्रेक्षकांना येईलच. यावेळी या दोघांनी त्यांच्या आयुष्यातील अनेक गोष्टी या शोमध्ये शेअर केल्या.

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसाधारण जनतेस जाहीररीत्या कळविण्यात येत आहे की श्री केशव सदानंद तावडे हे सर्व भार, दावा आणि मागणी यांपासून मुक्त, व्हिलेज मरोळ, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्व्हे क्र. १६०, हिस्सा क्र. ३, सी.टी.एस. क्र. ९४ धारक जमीनीवर बांधण्यात आलेला विजय नगर, मरोळ मरोशी रोड, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९ येथील मीनाक्षी कितिशा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. नावाच्या सोसायटीच्या इमारत क्र. एम मधील तळ मजल्यावरील मोजमाप ४६० चौ. फू. बिल्ट अप एरियाचा फ्लॅट क्र. २ (सदर फ्लॅट) धारक रहिवाशी फ्लॅटचे मालक आहेत.

मेसर्स विराट कंस्ट्रक्शन्स (विक्रेते) आणि श्री विनोद पुत्र मुरलीधर फेरवानी (इच्छुक सदस्य) यांचे दरम्यान क्रियान्वित नामाधिकार करार अर्थात विक्रीसाठीचा करार दिनांक १६.०६.१९८४ ची मूळ साखळी हरविली आहे, गहाळ झाली आहे आणि शोधूनही सापडत नाही आहे.

सर्व व्यक्ती ज्यांचे सदर मालमत्ता किंवा त्यातील कोणत्याही भाग संदर्भात वारसाहक्क, शेअर, विक्री, गहाण, भाडेपट्टा, ग्रहणाधिकार, परवाना, बक्षीस, विनिमय, विश्वस्त, ताबा किंवा भार किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणत्याही स्वरूपातील कोणताही दावा किंवा हक्क असेल तर त्यांना याद्वारे कळविण्यात येते की त्यांनी समर्थनीय मूळ कागदोपत्री पुराव्यांसह खालील स्वाक्षरीदारांना त्यांच्या कार्यालय क्र. बी-१ आणि बी-२, द गुरुप्रसाद सीएचएसएल, हनुमान रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई ४०० ०५७ येथील कार्यालय पत्त्यावर सदरहू सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत लेखी स्वरूपात याची माहिती द्यावी अन्यथा अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावा किंवा दावे, जर कोणते असतील, यांस सोडून दिले असल्याचे आणि/किंवा माफ केले असल्याचे मानले जाईल.

दिनांक १८ मार्च, २०२३
मेसर्स जे. के. जुरीस
ॲण्ड ॲसोसिएट्स,
ॲडव्होकेट्स ॲण्ड सॉलिसिटर्स,
स्वाक्षरी/-
(जय भार्गवराम)

आवास फायनान्शियर्स लिमिटेड

(पूर्वी एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड अशी ज्ञात) (सीआयएन: एल६५९२२आरजे२०११पीएलसीओ३४२९७)
नों. आणि कॉर्पो. कार्यालय : २०१-२०२, २रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर-३०२०२०.

कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **आवास फायनान्शियर्स लिमिटेडचे (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांत संबंधित सूचनेत नमूद केलेली रक्कम प्रदान करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना बोलाविण्याकरिता मागणी सूचना जारी केलेली आहे. कर्जदारांनी सदरहू रक्कम प्रदान करण्यास कसूर केलेली आहे म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा खालील नमूद रक्कम आणि त्यावरील पुढील व्याज या रकमेकरिता **आवास फायनान्शियर्स लिमिटेडच्या (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम	मिळकतीचे वर्णन	कब्जाची तारीख आणि प्रकार
आशिष द्वारकानाथ म्हात्रे, श्रीम. आर्या आशिष म्हात्रे (खाते क्र.) एलएनसीएचएल०१४१९-२००१२३२२७	९ जाने. २३ रु. १०५१८९५/- ५ जाने. २३ रोजी देय	फ्लॅट क्र. ४०२, चौथा, सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. १६४/१/२४, दत्तात्रय अपार्टमेंट स्थित येथे खेड, भाडगाव ता. खेड, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र. **मोजमापित ५६.४३ चौ.मीटर्स**	सांकेतिक कब्जा १६ मार्च २३ रोजी घेतला
सूर्यकांत अशोक भोईर, श्रीम. दर्शना भोईर (खाते क्र.) एलएनबीडीएल००३२०-२१०१५२९५७	९ जाने. २३ रु. ५४८२३७/- ५ जाने. २३ रोजी देय	फ्लॅट क्र. ००३, तळमजला, ए विंग, द्वारकामाई साई सागर, जमीन धारक स क्र. ६९, हिस्सा क्र. २ए येथे गाव डोन, ता अंबरनाथ ठाणे, महाराष्ट्र. **मोजमापित २७४ चौ.फू.**	सांकेतिक कब्जा १६ मार्च २३ रोजी घेतला
राज श्री निर्माण बिल्डर्स प्रा. लि., श्री. अजय शर्मा, श्री. भरत सोनारा, श्री. मोहम्मद इरफान अंसारी, श्री. नरेंद्र देशमुख, श्री. परेश मेर, श्री. राजेश पटेल (खाते क्र.) एलएनबीआरव्ही०२९१७-१८००५२९२१	९ जाने. २३ रु. ७५५६८६/- ५ जाने. २३ रोजी देय	फ्लॅट क्र. ००१, ००२, ए विंग, ००२, ००३ बी विंग, तळमजला, इमारत क्र. ७, फ्लॅट क्र. ३०१, ४०१, ४०४, एच विंग, ३०३, ४०१, ४०३, आय विंग, १०१, २०३, ३०४, ४०४, जे विंग, गोकुळ धाम झोन १, सक्र. २७, ७५ आणि ३३, वृंदावन नगरी, बोईसर (प), गाव पामटेंभी, पालघर ठाणे, महाराष्ट्र. **मोजमापित २२५०९.४६ चौ.मीटर्स**	सांकेतिक कब्जा १६ मार्च २३ रोजी घेतला

ठिकाण: जयपुर **दिनांक: १८-०३-२०२३** **प्राधिकृत अधिकारी, आवास फायनान्शियर्स लिमिटेड**

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय:२७ बीकेसी,सी २७,६ जी प्रभाग, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेस, वांद्रे (पू.), मुंबई -४०० ०५१.
कॉर्पोरेट ओळख क्र. : एल६५११०एमएच१९८५पीएलसी३११११३७) .
शाखा कार्यालय : अदमास प्लाझा, सीएसटी रोड, कोलीवेरी गाव, कुंचजही कुर्वे मार्ग, कलिना, सांताक्रूज (पू.), मुंबई - ४०००९८.

लिलाव व विक्रीसाठी जाहीर सूचना

कृपया सदर सूचनेला एक नवीन सूचना म्हणून समजा जी सामान्यत: लोकांना आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदार यांना दिली जात आहे की, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या प्रधिकृत अधिकाऱ्यांकडे गहाण ठेवली आहे, ज्याचा **भौतिक ताबा** कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, ती मालमत्ता ''जशी आहे जी आहे '', ''जशी आहे जेथे आहे '' आणि ''जे काही आहे'' या आधारावर विक्री करण्यात येईल, आमच्या ईवेब पोर्टलद्वारे ऑनलाइन सादर करण्यासाठी प्रस्ताव आमंत्रित केले आहेत. - लिलाव सेवा भागीदार, मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड अर्थात www.clindia.com स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी खाली स्वाक्षरी केलेल्या व्यक्तीने ज्याचे तपशील खाली दिले आहेत :-

ऋणको, हमीदार, गहाणकाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख व वेळ	स्थावर मालमत्तेचे वर्णन
(कर्ज खाते क्र. **आयएचएपी३१९३१** **१. श्री. राजेंद्र नथू पाटील (ऋणको) आणि** **२. श्रीम. कुसूम नथू पाटील (सह-ऋणको),**	**मागणी सूचना तारीख - १८.०२.२०२०, दि.१८.०२.२०२० रोजी अनुसार रु. ६६,४१,४५१.०३** (सहासष्ट लाख एक्केचाळीस हजार चारशे एकावन्न आणि पैसे तीन मात्र)	**मालमत्ता क्र. १-** गाव-ठाकुर्ली, डोंबिवली (पश्चिम), तालुका-कल्याण, जि.- ठाणे -४२१२०२ येथील सर्वे क्र. ३२७-ए, ३२७-ए/१-ए/१-ए धारक जमिनीवर एम.जी.रोड येथे स्थित, जय सृष्टी सी.एच.एस लि. नावाने ज्ञात इमारतमध्ये फ्लॅट क्र.ई-२, पहिला मजला ई विंग.

आरक्षित रक्कम	इसारा रक्कम ठेव (इरठे)	स्थावर मालमत्ता तपासणीची तारीख	लिलावाची तारीख व वेळ
रु. ७९,०५,००० (एकोऐंशी लाख पाच हजार मात्र)	रु. ७,९०,५००/- (सात लाख नव्वद लाख हजार पाचशे मात्र)	**२०.०४.२०२३ रोजी स.११ वा. ते दु. १२.०० वा.**	**२७.०४.२०२३ रोजी दु. २ वा. ते दु. ३.०० वा. पर्यंत.**
प्रस्ताव/ इरठे सादर करण्याची शेवटची तारीख :- २६.०४.२०२३ रोजी संध्याकाळी ५.०० पर्यंत. **बोली वाढविण्याची रक्कम : रु. ५०,०००/-** (रुपये पंन्नास हजार रुपये).			

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्ती : (१) लिलाव बोली दस्तऐवजाच्या पुढील अटी व शर्तींनुसार आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार आयोजित केला जातो. बोलीदार ई-लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील आणि बोली फॉर्म जो ऑनलाइन सादर करता येईल त्याकरिता आमच्या ई-लिलाव सेवा प्रदात्या मे. सी१ इंडिया प्रा. लि. म्हणजे बोली दस्तऐवजांसाठी https://www.bankeauctions.com च्या वेबसाइटवर जाऊ शकतात. ; **(२)** सर्व इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांनी वर नमूद केलेल्या वेब पोर्टलवर उपरोक्त तारीख आणि वेळेला https://www.bankeauctions.com या नावाने त्यांचे नाव नोंदणी करणे आवश्यक आहे आणि ई-लिलाव मध्ये सहभागी होण्यासाठी त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड विनामूल्य तयार करणे आवश्यक आहे. **(३)** ई-लिलावावरील कोणत्याही चौकशी, माहिती, समर्थन, प्रक्रिया आणि ऑनलाइन प्रशिक्षणासाठी, संभाव्य बोलीदार आमच्या ई-लिलाव सेवा भागीदार विनोद चौहान, दूरध्वनीद्वारे. क्रमांक: +९१ ७२९१९७११२४,२५,२६, मोबाइल क्र.: ९८१३८८७९३१ आणि ई-मेल आयडी: delhi@clindia.com आणि support@bankeauctions.com मार्फत मे. सी१ इंडिया प्रा. लि. विभागाशी संपर्क साधू शकतात. **(४)** प्राधिकृत अधिका-याच्या ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्ता/मालमत्तेमध्ये कोणताही भार नाही तथापि, इच्छूक बोलीदार बोली सादर करण्यापूर्वी वर नमूद केल्याप्रमाणे लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तेची आणि त्याच्या कागदपत्रांची किंवा इतर कोणत्याही तारीख आणि वेळेची आधी भेट घेऊन तपासणी करू शकतात आणि त्यांनी ई-लिलावात टाकलेल्या मालमत्तेचे टायटल, आणि दाव्यांबाबत स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी आणि दावे/हक्क/देय/ मालमत्तेवर प्रभावित करीत आहे. ई-लिलाव जाहिरात केएमबीएल ची कोणतीही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व करत नाही. केएमबीएलला ज्ञात किंवा अनोळखी सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. प्राधिकृत अधिकारी/सुरक्षित कर्जदार कोणत्याही तृतीय पक्षाच्या दाव्या/हक्क/देयांसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही; **(५)** ई-लिलावात सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोलीदार वेब पोर्टल (https://www.bankeauctions.com) वर व्याजमुक्त परत करण्यायोग्य इसार रक्कम ठेव (इरठे) भरण्याचे तपशील सादर/अपलोड करावे लागतील. वर नमूद केल्याप्रमाणे सुरक्षित मालमत्तेची पुणे/मुंबई येथे देय असलेल्या ''कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'' च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासस्थानाचा पत्ता पुरावा, बोर्डाच्या ठरावाच्या स्वयं-साक्षांकित प्रतीसह वर नमूद केल्याप्रमाणे कंपनी आणि पत्ता पुरावा.

कर्जदार/गहाणदार/जामीनदार यांना **सरफेसी कायद्याच्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१)** अन्वये याद्वारे ३० दिवसांची वैधानिक सूचना देण्यात आली आहे. सदर सूचनेच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत विद्यमान व्याज आणि खर्चासह वर नमूद केल्याप्रमाणे देय रक्कम, जर ते न दिल्यास सुरक्षित मालमत्ता नमूद केलेल्या अटी व शर्तींनुसार विकली जाईल, वर इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांमधील विक्री सूचनांच्या प्रकाशनांमध्ये काही विसंगती आढळल्यास, अशा परिस्थितीत, इंग्रजी वृत्तपत्र स्थानिक वृत्तपत्राची जागा घेतील आणि ती अंतिम प्रत मानली जाईल, त्यामुळे संदिग्धता दूर होईल. कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांनी बँकेची देय रक्कम, विक्रीच्या तारखेपूर्वी पूर्ण भरल्यास, लिलाव थांबवण्यास जबाबदार आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया आमच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या https://www.kotak.com/en/bank-auctions.html किंवा कलेक्शन अधिकारी कन्ह्याशाम गुप्ता ८३६९१५६९०९ kanhyasham.gupta@kotak.com आणि/किंवा श्री. अशोक मोटवानी @ ९८७३७३७३५१, ईमेल आयडी : ashok.motwani@kotalccom, वर नमूद केलेल्या बँकेच्या क्षेत्रीय कार्यालयात संपर्क साधावा.

विशेष सूचना : ई-लिलाव आमच्या सेवा प्रदाता मे. कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल) च्या वतीने **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** द्वारे पूर्व-निर्दिष्ट तारखेला आयोजित केला जाईल, बोलीदारांनी त्यांच्या स्वतःच्या घर/कार्यालये/ त्यांच्या बोलीच्या ठिकाणाहून त्यांच्या पसंतीनुसार राखीव किमतीच्या वर उद्धृत केले पाहिजे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि इतर सामानाची आवश्यकता बोलीदारांनी स्वतःच सुनिश्चित केली पाहिजे. कृपया लक्षात घ्या की इंटरनेट कनेक्टिव्हिटी (कोणत्याही कारणामुळे असो) अयशस्वी होणे ही केवळ बोलीदारांची जबाबदारी असेल आणि या अनपेक्षित परिस्थितीसाठी केएमबीएल किंवा मे. सी१ इंडिया प्रा. लि. दोघेही जबाबदार असणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी, बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी सर्व आवश्यक व्यवस्था/पर्यायी कराव्यात जेणेकरून ते अशा परिस्थितींना तोंड देऊ शकतील आणि तरीही ते यशस्वीरित्या ई-लिलावात सहभागी होऊ शकतील. तथापि, अशी कोणतीही गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की, त्यांची बोली उद्धृत करण्यासाठी/सुधारणा करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत थांबू नये.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लि.

दिनांक : १७/०३/२०२३
ठिकाण:- मुंबई

आज, रात्रौ ८:३० वा.
दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले
BIG CANVAS ENTERTAINMENT | Purple Events Creating memories
7th CONSECUTIVE YEAR An Evening With DR. ASHWINI BHIDE-DESHPANDE
विदुषी डॉ. अश्विनी भिडे देशपांडे ह्यांचं शास्त्रीय गायन आणि मुलाखत
मुलाखतकार: श्री. अंबरीश मिश्र
साथसंगत:
पं. विश्वनाथ शिरोडकर (तबला)
विदुषी सीमा शिरोडकर (संवादिनी)
Co-Sponsor SBI general INSURANCE SURAKSHA AUR BHAROSA DONO
ऑनलाईन बुकिंग BookMyShow वर सुरू
शिल्लक तिकीट विक्री नाट्यगृहावर उपलब्ध
आयोजक: अभिजित विठ्ठल सावंत । प्रियांका साठे । संतोष जोशी

संस्कृती मंत्रालय भारत सरकार
अमृत नाट्य भारती, मुंबई मराठी साहित्य संघ, नाट्यशाखा प्रस्तुत
संगीत माऊली
आज शनि.दुपारी ४ रवींद्र नाट्यमंदिर प्रभादेवी
तिकीट विक्री सुरु
लेखक, गीतकार : प्रदीप ओक । दिग्द. : प्रमोद पवार । संगीत दिग्द. : डॉ.राम पंडित । नेपथ्य : सुधीर ठाकूर । प्रकाश योजना : शाम चव्हाण
वादक : प्रकाश वगळ/निलेश भिवंडकर, साई बँकर, विशाल जोगळेकर । तंत्रज्ञ : सुहास पराडकर, सुमेध उन्हाळेकर
निर्मिती प्रमुख : डॉ.अश्विनी भालेराव गांधी । कलाकार : तन्वी गोरे, आनंद पालव, ऋता पिंगळे, श्रेयस व्यास, मनोज नटे, सचिन नवरे आणि साहिल विशे व शरण्या शेणॉय ★ संपर्क : छोटू आजगावकर ९८१९१८२३२६
बीवायपी

online tkts- bookmyshow फोन बुकिंग ९१६७२७५५३०
उद्या दु.४ विष्णुदास भावे,वाशी
ति.वि. थिएटरवर सुरू.
बुध २२ (सुट्टी) दु.४ प्रबोधनकार ठाकरे,बोरिवली ति.वि. उद्यापासून
शनि १ एप्रिल दु.४.३० गडकरी रंगायतन,ठाणे
सरगम + अमरदिप निर्मित कल्पकता प्रकाशित
सफरचंद
लेखिका- स्नेहा देसाई रुपांतर- मुग्धा गोडबोले
दिग्दर्शक- राजेश जोशी संगीत- सचिन जिगर
शर्मिला शिंदे
प्रमोद शेलार
संजय जमखंडी
आणि शंतनु मोघे
निर्माते- भरत नारायणदास ठक्कर, प्रविणा भोसले, अजय कासुर्डे
सूत्रधार- गोट्या सावंत ९८६९३४८८८७ विशेष आभार- मिनाक्षी सुधीर निंबाळकर

online tickets- bookmyshow
आज दु.३.३० श्री शिवाजी मंदिर,दादर
ति.वि. थिएटरवर सुरू. फोन बुकिंग ९७७३४१७७७६
२५ नगर, २६ पुणे | शुक्र ७ एप्रिल (सुट्टी) दु.४ प्र.ठाकरे,बोरिवली
समुद्रमंथन निर्मित
वाकडी तिकडी
प्रमुख भूमिकेत- उदय नेने, सचिन वळंजू आणि अंशुमन विचारे

आज, शनिवार, दि. १८ मार्च रात्रौ ८. ३० वा. श्रीशिवाजी मंदिर, दादर
लतादीदी - किशोरदा
बॉलिवूडच्या सुपरहिट हिंदी चित्रपट गीतांचा संगीतमय नजराणा!
स्वरलता
bookmyshow

आता मोजकेच प्रयोग!
online tickets-bookmyshow
मंगळ ४ (सुट्टी) दु.४ वा.
प्रबोधनकार ठाकरे बोरिवली
फोन बुकिंग ९८२०३१५४०४

सन्माननीय पाहुणे: मा.श्री. सुशीलकुमार शिंदेजी, सौ. उज्वलताई शिंदे, प्रणीताताई शिंदे
तिकीट विक्री आज पासून सुरू
संकल्पना: शर्मिला शाह
निवेदन: मंगला खाडीलकर
वाद्यवृंद संयोजन: संजय मराठे
प्रयोग क्रमांक 4001
सुनहरी यादें
प्रमिला दातार, वंदना टिळक, मंजिरी जुवेकर, नितिन, विनय, अयाज आणि राजू काजे
बुधवार, 22 मार्च, 2023 | रात्री 8.30 वाजता
श्री शिवाजी मंदिर, दादर
संपर्क - श्री अशोक दातार: 93244 59021
विशेष उपस्थिति - हास्य सम्राट श्री .जॉनी लिव्हर

५० टक्के सवलत बोरिवलीच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी
रात्रीस खेळ चाले फेम वच्छी संजीवनी पाटील
शुक्र. २४ दु.४ वा.प्रबोधनकार ठाकरे, बोरिवली
सोम. २७ दु.४:३० वा.गडकरी रंगायतन, ठाणे
साई आर्टस निर्मित
रियुनियन
लेखक सुरेंद्र जगे दिग्दर्शक विशाल राऊत

पांडव निर्मित
कलाभारती + चंद्रलेखा फाऊंडेशन प्रकाशित
घाशीराम कोतवाल
लेखक- विजय तेंडुलकर
संगीत- भास्कर चंदावरकर
नृत्य- कृष्णदेव मुळगुंद
दिग्दर्शक- विजय गोविंद
निर्माता- मेघराजराजे भोसले
प्रयोग संपर्क- सुरेंद्र दातार ९३२०९१३९८८